महासागर
गोंदिया
पान ३
बुधवार, दि. २ जुलै २०२५

## अंगणवाडी सेविका संपात होणार सहभागी

प्रतिनिधी / गोंदिया

महाराष्ट्र राज्य अगणंवाडी बाल वाडी कर्मचारी युनियन आयटकची सभा २८ जून रोजी पार पडली. या सभेत ९ जुलै रोजी नाशिक येथे आयोजित संपात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला. या संपात संघटीत असंघटीत क्षेत्रातील कामगार सहभागी होणार आहेत. शकुंतला फटींग यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सभेत हा निर्णय घेण्यात आला.

जुने ४० कायद्यात बदल करून ४ लेबर कोड तयार केले जात आहे. याचा कामगार वगार्तून विरोध केला जात आहे. तसेच असंघटीत क्षेत्रातील अगणंवाडी सेविका, मदतनिस यांना २६ हजार रुपए किमान वेतन लागू करण्यात यावे, ग्रेजुटी लागु करण्यात यावे, जनसुरक्षा कायदा रद्द करावा, आदि मागण्यांच्या पुर्ततेसाठी संप होणार आहे. या संपात आयटकच्या नेतृत्वात जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मतदनिस सहभागी होणार आहेत. संपात सहभागी होण्याचे आवाहन हौसलाल रहांगडाले, पौर्णिमा चुटे, बिरजूला तिडके, अनिता शिवनकर, प्रणिता रंगारी, विठा पवार, विना गौतम, अजना ठाकरे, काचंन शहारे, ज्योति लिल्हारे, पुष्पा भगत, अर्चना मेश्राम, लालेश्वरी शरणागत, पंचशिला शहारे, वन्दना पटले, मिनाछी पटले, लता बोरकर, शामकला मसराम आदिनी केले आहे.

महासागर
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी
जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट, गांधी प्रतीमा चौक, गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

## दृष्टिक्षेप

### विषबाधेने महिलेचा मृत्यू

**गोंदिया :** आमगाव पोलिस ठाण्यातंर्गत डोंगरगाव येथे महिलेला विषबाधा झाल्याने रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच तिचा मृत्यू झाला. ही घटना २६ जून रोजीची आहे. हिरणबाई फुलीचंद लिंगे असे मृतक महिलेचे नाव आहे. विषबाधा झाल्याने हिरणबाईला रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोहवा चौधरी करीत आहेत.

### अंगणातून दुचाकी लंपास

**गोंदिया :** ग्रामीण पोलिस ठाण्यातंर्गत तुमखेडा/बु. येथे अंगणात ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. ही घटना २७ व २८ जून दरम्यानची आहे. फिर्यादी दिपक कुंवरलाल रहांगडाले (५९) रा.तुमखेडा बु. यांनी दुचाकी क्र.एमएच-३५/झेड-३९५८ अंगणात ठेवली होती. अज्ञात चोरट्यांनी डाव साधून दुचाकी चोरून नेली. चोरीस गेलेली दुचाकी २० हजार रुपए किंमतीची होती. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोहवा भैसारे करीत आहेत.

### डेंग्यूचा वाढतोय धोका

**गोंदिया :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दरवर्षी पाऊस पडतो. यंदाही चांगला पाऊस होण्याची शक्यता असून डबके, पाणी साचण्याच्या जागेत डासांची उत्पत्ती होते. यामुळे नागरिकांनी परिसर स्वच्छता, कोरडा दिवस पाळणे आणि घराजवळ पाणी साचण्याच्या जागा नष्ट कराव्यात, जेणेकरून डासांची उत्पत्ती होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी केले आहे. आरोग्य विभाग, जिल्हा हिवताप विभाग आणि न.प. प्रशासन डेंग्यू होऊ नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. एडीस इजिप्ती डासाची उत्पत्ती साठवलेल्या स्वच्छ पाण्यात होत असल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गृहभेटीमध्ये प्रत्येक गावात घरांना भेट देऊन कीटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जात आहे. प्रत्येक घरातील वापरण्यासाठी भरण्यात येणारे पाणी साठे तपासले जात आहेत. पाणीसाठ्यात डेंग्यू डासाच्या अळ्या आढळून आल्यास ती भांडी रिकामी करावी लागतात. रिकामे करता न येणाऱ्या पाणी साठ्यात टेमिफॉस किंवा बेटचे द्रावण टाकण्यात यावे, अशी माहिती डॉ. गोल्हार यांनी दिली. डेंग्यू, मलेरियापासून आपल्या घराला सुरक्षित ठेवण्यासाठी आपणाला आरोग्य विभागाने सुचविलेल्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे.

### चिखलातून शोधावा लागतोय रस्ता

**अर्जुनी मोर.:** तहसीलमधील केशोरी येथील मटण, चिकन मार्केटमध्ये चिखलाचे साम्राज्य असल्यामुळे व्यापारी आणि ग्राहक प्रचंड नाराज झाले आहेत. बाजार परिसरातील रस्त्यावर चिखल साचल्यामुळे नागरिकांना चिखलातून मार्ग काढावा लागत आहे. इतकेच नव्हे तर केशोरी पोलिस ठाण्यासमोरही रस्त्यावरील खड्ड्यांमुळे पावसाचे पाणी साचते, ज्यामुळे ये-जा करणे कठीण झाले आहे. या समस्येकडे ग्रामपंचायतीने लक्ष देऊन रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे. मॉन्सून हंगाम सुरू झाला आहे, परंतु गटारांची वेळेवर साफसफाई न झाल्यामुळे पाणी सरळ रस्त्यावर वाहताना दिसत आहे. त्यासोबतच केशोरी भागातील मटण व चिकन मार्केट परिसरात पावसामुळे चिखलाचे साम्राज्य पसरले असून, वाहनधारकांना खड्ड्यांतून मार्गक्रमण करावे लागत आहे.

# कारची झाडाला धडक दोघे जागीच ठार, १ गंभीर जखमी

## देवरी जवळील परसटोला शिवारातील घटना



प्रतिनिधी / गोंदिया

भरधाव कारची रस्त्याच्या कडेवरील बीजाच्या झाडाला धडक बसून झालेल्या अपघातात दोन युवकांचा जागीच मृत्यू, तर एक युवक गंभीर जखमी झाल्याची घटना आज, मंगळवार १ जुलै रोजी पहाटे ४:०० वाजताच्या सुमारास देवरी-चिचगड मार्गावर परसटोला शिवारात घडली. राजा भारती (३५), सोहेल शेख (३२) असे मृतांची नावे असून सलमान शेख(२५) असे गंभीर युवकाचे नाव आहे.

देवरी येथील तीन युवक कार क्रमांक सी.जी. ०८ आर ६२५५ देवरी-चिचगड मार्गावरून देवरीकडे येत असताना परसटोला शिवारातील फॉरेस्ट नाक्याजवळ चालकाचे स्टेअरिंगवरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या कडेवरील बीजाच्या झाडाला जाऊन धडकली. या अपघातात राजा भारती व सोहेल शेख या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर मागच्या सिटवर बसलेला सलमान शेख सिटमध्ये अडकल्याने गंभीर जखमी झाला असून त्याचे दोन्ही पाय निकामी झाल्याचे सांगण्यात येत आहे. शहरापासून हाकेच्या अंतरावर हा अपघात झाल्याने अपघाताचा आवाज ऐकताच नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून नागरीकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. अपघातात वाहनाचा पुर्णतः चेंदामेंदा झाल्याने पोलिस व नागरिकांनी कारमधील लोकांना बाहेर काढण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. यावेळी गॅस कटरच्या सहाय्याने मृतदेह व जखमीला बाहेर काढण्यात आले.

यानंतर जखमी युवकाला उपचारासाठी गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. तर दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी देवरीच्या ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. देवरी पोलिसांकडून घटनेची नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

### तीन तासाचा अथक प्रयत्न..

**कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. त्यामुळे मृतदेह व जखमी युवक वाहनात चांगलेच अडकून होते. तीन तासाच्या शर्तीचे प्रयत्नानंतर मृतदेह व जखमीला बाहेर काढण्यात यश आले.**

# शिवशाहीचा पुन्हा अपघात, जीवहाणी टळली



प्रतिनिधी / गोंदिया

गोंदिया कोहमारा राष्ट्रीय महामार्गावर आज १ जुलै रोजी सकाळी ११.४५ वाजेच्या सुमारास डव्वा-खजरी दरम्यान शिवशाही बसचा अपघात झाल्याची घटना घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवहाणी झाली नाही. गेल्या वर्षी याच मार्गावर याच परिसरात शिवशाही बसचा अपघात होऊन ११ प्रवाशांना आपला जीव गमावावा लागला होता.

या अपघातामुळे नागरिकांमध्ये त्या अपघाताच्या आठवणी ताज्या झाल्या. राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सुरक्षित, वेगवान व आल्हादायक प्रवासासाठी शिवशाही बससेवा सुरू केली. गोंदिया आगारातूनही शिवशाही बससेवा सुरु आहे. परंतु शिवशाही बसचा प्रवास त्रासदायक व धोकादायक ठरत असल्याचे प्रकार यापूर्वी समोर आले आहे. गेल्या वर्षी २९ नोव्हेंबर रोजी याच मार्गावर शिवशाही बसचा अपघात होऊन ११ प्रवाशांचा बळी गेला होता. तसेच दोन महिन्यापूर्वी याच परिसरात शिवशाही बसचा अपघात झाला होता.

हे अपघात जिल्हावासी अद्यापही विसरलेले नाही. त्याचत आज, १ जुलै रोजी सकाळी ११.४५ वाजताच्या सुमारास डव्वा-खजरी दरम्यान शिवशाही बसला झालेल्या अपघाताने गेल्या वर्षीच्या आठवणी ताज्या झाल्या. एमएच ०६, बीडब्ल्यू ११७ क्रमांकाची शिवशाही बस गोंदियावरुन नागपूरला जाण्याकरीता निघाली. दरम्यान गोंदिया-कोहमारा मार्गावरील डव्वा ते खजरी दरम्यान विरुध्द दिशेने येणाऱ्या दुचाकीला वाचविण्याकरिता बसचालक गजानन सिडाम याने एकदम स्टियरिंग फिरविल्याने बस अनियंत्रित होत विरुध्द दिशेला शेतातील झाडावर आदळली. सुदैवाने झाड लहान असल्याने अपघटीत टळले. बसमधील असलेल्या ५० प्रवाशी सुरक्षीत होते. दरम्यान महामार्गाने जाणाऱ्या नागरिक आपले वाहन थांबवित बसमधील प्रवाशाच्या मदतीला धावले. घटनेची माहिती मिळताच डुग्गीपार पोलिसांनी घटनास्थळ गाठून प्रवाशांना बाहेर काढले.

# शिक्षकांच्या संवेदनशीलतेने अपघातातील दोघांना जीवदान

## पावसामुळे टिप्पर उलटला, परसोडी-गडेगाव मार्गावरील घटना



प्रतिनिधी / गोंदिया

देवरी तालुक्यातील परसोडी ते गडेगाव मार्गावर आज, १ जुलै रोजी सकाळच्या सुमारास पावसामुळे निसरड्या झालेल्या रस्त्यावर रेती भरलेला टिप्पर पलटला. प्रसंगी या मार्गाने जाणाऱ्या शाळेत जाणाऱ्या शिक्षकांनी वेळीच दाखविलेल्या संवेदनशीलता व धैर्यामुळे टिप्परमध्ये अडकलेल्या जखमी चालक व त्याच्या सहकायार्चा जीव वाचला.

जिल्ह्यात आज सकाळपासूनच सर्वत्र पावसाचा जोर होता. संततधार पावसामुळे रस्त्यामुळे वाहतूक करणे जिकरीचे होते. अशात कोहमाराकडून देवरीकडे जाणारा सीजी २४, यू २१११ क्रमांकाचा रेती भरलेला टिप्पर परसोडी ते गडेगाव दरम्यान निसरड्या रस्त्यावर पलटला. यात चालक व त्याचा सहकारी जखमी होऊन टिप्परमध्ये अडकले. प्रसंगी याच मार्गाने शाळेत जाणारे दिलीप शिवणकर, राजेश रामटेके, शिवकुमार राऊत, धनाजी मरई, प्रियंका रामटेके या शिक्षकांनी जीवाची पर्वा न करता मदतीसाठी पुढाकार घेतला. भर पावसात त्यांनी टिप्परमध्ये अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी अथक प्रयत्न केले. शिक्षकांच्या या संवेदनशीलता व धैर्यामुळे संभाव्य जीवितहानी टळली. काही वेळातच स्थानिक नागरिक आणि पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले

या प्रसंगामुळे केवळ शिक्षकांच्या सामाजिक भानाचे नव्हे तर त्यांच्या धैर्याचे आणि माणुसकीच्या भावनेचेही दर्शन घडले. गावकऱ्यांनी त्यांच्या या कार्याचे कौतुक केले असून, शिक्षक ही केवळ शाळेतच नव्हे तर समाजातही मार्गदर्शक असतात, हे पुन्हा एकदा या घटनेतून अधोरेखित झाले.

### पाऊस सुरू होताच वाढली पाठदुखी !

**गोंदिया :** पावसाळा सुरू होऊनही जिल्ह्यातील अनेक रस्ते खड्यात आहेत. शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याची कामे अधिक जोमाने केली गेली. मात्र, ग्रामीण भागातील खड़े बुजवले नसल्याने खड्ड्यांतून, पयार्याने पाठदुखी, कंबरदुखीतून सुटका कधी होईल? असा सवाल नागरिक करत आहेत. पहिल्याच पावसात ठिकठिकाणच्या रस्त्यांवर खड्डे पडण्यास सुरुवात होते.

खड्ड्यांमुळे वाहने चालवणे जिकरीचे बनते, तितकेच गंभीर परिणाम आरोग्यावरही उद्धवतात. खड्ड्यांमुळे पाठदुखी, कंबरदुखी, मानदुखी अशा समस्या जाणवू लागल्या आहेत. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठमोठाले खड्डे पडले असून, वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. जिल्ह्यातील अनेक रस्त्यांवर खड्डे दिसत असून, अनेक दुचाकीस्वारांना याचा त्रास होत आहे.

### दागिण्यांसह रोख लंपास

**गोंदिया :** नजिकच्या फुलचूर येथील आंबाटोली वॉर्ड क्र.२ येथे अज्ञात चोरट्यांनी सुना मौका साधून घरात ठेवलेले सोने-चांदीचे दागिण्यासह रोख रक्कम लंपास केली. ही घटना २५ ते २८ जून दरम्यानची आहे. फिर्यादी जगदिश हिरालाल बघेले रा.छोटा गोंदिया यांच्या तक्रारीवरून गोंदिया ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा दशरिया करीत आहेत.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम वेळेत पुर्ण करा : खा.प्रफुल्ल पटेल

प्रतिनिधी / गोंदिया

खासदार प्रफुल पटेल हे जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले. दरम्यान त्यांनी आरोग्य विभाग व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम वेळेत पुर्ण करण्याच्या सचुना केल्या. उल्ल्खनेयी असे की, खासदार पटेल यांनी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ व आरोग्य विभागाचे सचिव व आयुक्त यांच्याशी इमारतीच्या प्रगतीविषयी सविस्तर चर्चा केली होती.

कुडवा येथे ६९० कोटी रुपये निधीतून अत्याधुनिक सुविधा असलेली नवीन इमारतीत ६५० खाटांची रुग्णसेवा व १५० विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण या महाविद्यालयात होणार आहे. खासदार प्रफुल पटेल हे परिसरातील नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्नशील असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम वेळेत व दजेर्दार बांधकाम होईल असा विश्वास यावेळी खासदार प्रफुल पटेल यांनी व्यक्त केला.

# जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात भाकपचे आंदोलन



प्रतिनिधी / गोंदिया

भारतीय कम्युनिष्ट पक्षाचे राज्य अधिवेशन नाशिक येथे पार पडले. दरम्यान महाराष्ट्रात जनसुरक्षा विधेयकाचा प्रखर विरोध करण्यात आला तसेच ३० जून रोजी आजाद मैदानातून विधानसभेवर पक्षाच्या वतीने मोर्चा काढून जनविरोधी महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयका विरोध करीत सरकारने विधेयक मागे घ्यावा, अशी मागणी केली.

मोर्च्यात राज्य कार्यकारिणी सदस्य हौसलाल रहांगडाले, मिलींद गणवीर, परेश दुरुगवार, अशोक मेश्राम, रामचंद्र पाटील, करुणा गणवीर, कल्पना डोंगरे, शालुबाई कुथे, प्रल्हाद उके, शेखर कनोजिया, गुणवंत नाईक, शंकर बिजलेकर, जितेंद्र गजिभये, दुलीचंद कावडे, डोमाजी बावनकर, शामराव पंधराम आदी उपस्थित होते.

# वैद्यकीय शिक्षण विभागाचा अजब कारभार

## वैद्यकीय महाविद्यालयाला वाऱ्यावर ठेवून सहयोगी प्राध्यापकांची बदली

प्रतिनिधी / गोंदिया

अलीकडे वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रशासकीय इमारत व भौतिक सोयी-सुविधांना घेवून खा.प्रफुल पटेल सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. तर दुसरीकडे वैद्यकीय शिक्षण विभागातील यंत्रणा गोंदिया येथील वैद्यकीय महाविद्यालयाला वाऱ्यावर ठेवून प्राध्यापकाची पोकळी जाणून निर्माण करीत आहे. त्यामुळे गोंदिया येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या दजेर्दार शिक्षण व आरोग्य सेवेला घेवून प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. नुकतेच विभागाकडून गोंदिया येथील तीन सहयोगी प्राध्यापकांचे स्थानांतरण करण्यात आले आहे. मात्र या महाविद्यालयाला एकही नवे प्राध्यापक देण्यात आले नाही. त्यामुळे हा अन्यायपुर्वक कारभार जाणून केला जात आहे? असा संताप व्यक्त केला जात आहे.

अलीकडे राज्य शासन जिल्हास्तरावर वैद्यकीय महाविद्यालय उभारून नागरिकांना दजेर्दार आरोग्य सेवा पुरविण्याचे आश्वासन देत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनाही दजेर्दार वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न दाखविले जात आहे. मात्र वैद्यकीय शिक्षण विभागच वैद्यकीय महाविद्यालयाच्या खालावत्या शैक्षणिक दजेर्ला जबाबदार ठरत



आहे, या परिचय खुद्द आपल्या अफलातून कारभारातून देत आहे. प्राध्यापक तथा इतर कर्मचाऱ्यांची पदस्थापना, बदली प्रक्रिया व इतर बाबीला घेवून वैद्यकीय शिक्षण यंत्रणेत चाललेय काय? याचे गुढ उकलने गरजेचे झाले आहे.

गोंदिया येथील सहयोगी प्राध्यापक डॉ.अर्चना रंदाळे, डॉ.अक्षय चव्हाण व गोपाल अग्रवाल यांचे नागपूर येथे स्थानांतरण करण्यात आले आहे. मात्र यामुळे रिक्त झालेल्या पदावर कुणाचीही नियुक्ती करण्यात आली नाही. याशिवाय भंडारा येथील सहयोगी प्रा.डॉ.राहुल खोब्रागडे यांची नागपूर, हिंगणघाट येथील प्रा.डॉ.नामदेव कांबळी यांची देखील नागपूर येथे बदली करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व प्राध्यापकांचे स्थानांतरण नागपूर येथेच का? या प्राध्यापकांना इतर ठिकाणी सेवा द्यायची नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. वैद्यकीय शिक्षण यंत्रणेतील वरिष्ठ अधिकारी देखील टेबलावर पडलेल्या वजनाला घेवूनच प्राध्यापकांच्या बदल्या करीत आहेत का? अशीही शंका-कुशंका व्यक्त होवू लागली आहे. अलीकडे नागपूर येथे जागा रिक्त नसतानाही बदल्या व पदस्थापना देवून शासनाला लाखो रूपयाचा चुना लावला जात आहे. तर दुसरीकडे गोंदिया सारख्या दुर्गम जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापकांचा वाणवा ठेवून तेथील वैद्यकीय शिक्षण कमकुवत करण्याचा हा घाट रचला जात असल्याचेही समोर आले आहे. याकडे लक्ष देवून राज्य शासनाने वैद्यकीय शिक्षण मंत्रालयातील त्या विदुरांची चौकशी करावी, अशी मागणी केली जात आहे.

# भूमिगत गटार योजना शहरवासीयांसाठी डोकेदुखी

## रस्त्यांवरील खड्डयात अडकताहेत वाहने



प्रतिनिधी / तिरोडा

गोंदिया नतर आता तिरोडा शहरातही नगर परिषद अंतर्गत भूमिगत गटार योजनेची कामे केली जात आहे. यासाठी रस्त्याच्या मधोमध मोठे खड्डे खोदून पाईप लाईन टाकण्यात येते. आज पहिल्याच पावसाने भूमिगत गटार योजनेच्या कामाची पोलखोक केली आहे. कंत्राटदाराच्या मनमर्जी कारभार व निकृष्ट कामामुळे जागोजागी खड्डे पडले व पावसाचे पाणी साचून राहिले तसेच या खड्डयामध्ये वाहन अडकल्याने नागरिकांना वाहतूक कोडींचा सामनाही करावा लागले. उल्लेखीय असे की, या भूमिगत गटरा योजनेमुळे तिरोडा शहर चिखलमय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

तिरोडा शहरात गटर लाईन टाकण्यासाठी शहराच्या मध्यवर्ती रस्त्यांवर खोलखोल खड्डे केले. त्यानंतर त्यामध्ये पाईप टाकून माती भरण्यात आली. मात्र, रस्ता सुरळीत करण्याचे काम अर्धवट सोडण्यात आले. काही ठिकाणी माती टाकली गेली असली तर, रोलर चालवला नाही. परिणामी संपूर्ण शहरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. पावसाळ्याच्या पहिल्या पावसात खड्ड्यांमध्ये पाणी साचून मोहनलाल चौक, आगाशे लेआउट,



साई मंदिर, किल्लावाड ठाकूर मौला, जुनी वस्ती, सहकार नगर या ठिकाणी टेम्पो, टॅक्सी, कार, ट्रॅक्टर्स अडकल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण झाली असून अपघातांची शक्यता वाढली आहे. दुचाकीस्वार घसरून पडत असून, काही ठिकाणी वाहने खड्ड्यांमध्ये अडकले आहेत. नागरिकांनी याला थेट ठेकेदार कंपनीची निष्काळजीपणा जबाबदार धरला आहे.

### अर्धवट कामामुळे नागरिकांचे हाल

**शहरात भूमिगत गटार योजनेच्या कामाला सुरुवात झाली आहे. या योजनेमुळे अनेक ठिकाणी अंडरग्राउंड केबल्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शहरातील विविध भागांत स्ट्रीट लाईट्स बंद पडून आहेत. तसेच पावसाळा सुरू होताच भूमिगत गटार योजनेची कामे अर्धवट करण्यात आल्याने नागरिकांची हाल होत आहेत. रस्त्यांवर साचलेले पाणी, चिखल व धूळीमुळे ये-जा करणे कठीण झाले आहे. नगर परिषद प्रशासनाने या बाबीकडे लक्ष द्यावे व संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे.**

# विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे एक दिवसीय आंदोलन



प्रतिनिधी / गोंदिया

शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात चालणाऱ्या भ्रष्टाचाराची राज्यस्तरीय एआयटी चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मुख्य मागणीला घेवून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने नागपूरच्या शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर एक दिवसीय आंदोलन केले.

आंदोलनात संपूर्ण विदर्भात शिक्षण विभागात उपसंचालक, शिक्षण अधिकारी, गटशिक्षण अधिकारी यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, त्यामुळे शिक्षण विभागात अनेक समस्या आणि प्रकरणे प्रलंबित आहेत, ज्या सोडवण्यासाठी पदोन्नती किंवा नियुक्तीद्वारे ती पदे त्वरित भरण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी सरचिटणीस डॉ.अशोक गवाणकर, रमेश काकडे, राजेश धुर्वे, अनिल गोतमारे, महेंद्र सालणकर, सुनील शेरकी, अशोक गवाणकर, गोंदिया जिल्हा प्रभारी ॲड. रतन वासनिक आदी उपस्थित होते.


## तालुकास्तरीय हिवताप कार्यशाळा संपन्न

**तिरोडा :** राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जुन महिन्यात दि.१ ते ३० जुन हिवताप प्रतिरोध महिना साजरा केला जातो.या महिन्यादरम्यान, हिवताप, डेंग्यू, चिकनगुनिया आणि मेंदूज्वर यांसारख्या आजारांपासून बचाव करण्यासाठी जनजागृती मोहिम आणि प्रतिबंधात्मक उपाय योजना राबवल्या जातात. या अनुषंगाने हिवताप व इतर कीटकजन्य आजाराविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यात येत असते तसेच हिवताप,डेंग्यु व इतर कीटकजन्य आजाराबाबत कार्यशाळेतुन विविध अद्यावत प्रशिक्षण कार्यक्रम सुद्धा आयोजन केले जात असल्याचे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी म्हटले आहे.

२६ जुन रोजी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय तिरोडा येथे पावसाळा पूर्व किटकजन्य आजार नियंत्रण, जलजन्य आजार व उपाययोजनासंबंधी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण व तिरोडा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दर्शना नंदागवळी यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाली.यावेळी तिरोडा तालुक्यातील पाचही प्राथमिक आरोग्य केंद्र व उपजिल्हा रुग्णालय तिरोडा येथील आरोग्य सहाय्यक व आरोग्य सेवक उपस्थित होते. हिवताप कार्यशाळेत हिवताप विभागाचे कीटकशास्त्रज्ञ अनिल चोरवाडे, जिल्हास्तरीय पर्यवेक्षक किशोर भालेराव,एंम्बेड अशासकीय संस्थेचे जिल्हास्तरीय समन्वयक कांचन बिसेन यांनी मार्गदर्शन केले. जिल्हास्तरीय पर्यवेक्षक किशोर भालेराव यांनी हिवताप प्रतिबंधात्मक उपाय जसे गप्पी मासे,अँबेट सोडणे,संडास-बाथरुम च्या पाईपला व्हेंट जाळी बसविणे,मच्छरदाणीचा वापर,गुणवत्तापुर्ण फवारणी, नियमित गृहभेटी दरम्यान करावयाचे कामे, विविध विभागांचा हिवताप कमी करण्याची जबाबदारी कीटकजन्य आजारासंबंधी माहिती व कीटकजन्य आजारावर शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचा अवलंब करून प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# शाळेपेक्षा कोचिंगकडे विद्यार्थ्यांचा कल

## खासगी शिकवणूकीचे दुकाने थाटली



**गोंदिया :** प्रत्येक विद्यार्थी शाळेत मन लावून शिकतो. शिक्षक ही त्यांना चांगले शिकवतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या स्पर्धेत शिक्षक वर्ग देखील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेत प्रवेश घ्यावा, यासाठी आग्रही असतात. त्यासाठी गणवेश, पुस्तके, सायकल, वह्या अशी विविध आमिषेही दिली जातात. मात्र, सध्या शाळेच्या शिक्षणापेक्षा विद्यार्थी व पालकांचा कल कोचिंगकडे अधिक असल्याचे दिसून येते.

आपला पाल्य अधिकाधिक गुणांनी उत्तीर्ण व्हावा, त्याने इतर विद्यार्थ्यापेक्षा अधिक गुण मिळवावे, अशी पालकांची अपेक्षा असून या हव्यासापोटी तो आपल्या पाल्याकरिता कोचिंगसाठी पाण्यासारखा पैसा खर्च करतो. आजकाल पालक वर्ग नर्सरी, केजी १, केजी २ पासून आपल्या पाल्याला शाळेत टाकतात. त्यानंतर बालवयातही त्याने चांगले गुण मिळवावे, यासाठी पालक त्यांच्यासाठी ट्युशन वर्ग लावतात. एकूणच दहावी, बारावीपर्यंत तर कोचिंग क्लासेस लावण्याची जणू स्पर्धाच झाली आहे. त्यानंतर पुढील त्या-त्या शिक्षण क्षेत्रासाठी हमखास कोचिंगची आवश्यकता मानली जाते. कोचिंग, अभ्यास, लायब्ररी आदींच्या माध्यमातून अपेक्षित शिक्षणात उंचीवर जाऊन यश मिळवावे, अशी प्रत्येक पालकाची अपेक्षा असते. त्यासाठी आपल्या पाल्यावर पाण्यासारखा पैसाही ते खर्च करीत असतात. त्यातून यश मिळाले तर ठीकच अन्यथा पालकही नाराज होतात तर विद्यार्थी देखील हताश होतो. त्याच्या मानसिकतेचे खच्चीकरण होते.

### कोचिंग क्लासेसमध्ये लाखोंची फी

अपेक्षित शिक्षणात यश मिळाले नसल्याने पर्यायी शिक्षण घेऊन तो मिळेल तो जॉब करतो किंवा अपेक्षित यश न मिळाल्याने अनेक जण टोकाचा निर्णय ही घेतात, असे पहायला मिळते. मात्र, शिक्षण हे अमृत आहे. ते जेवढे घेतले ते फार उपयोगाचेच आहे. नीट. जेईई, सीईटी आदीसाठी विद्यार्थी नामवंत कोचिंग क्लासेसमध्ये लाखो रूपये भरून प्रवेश मिळवतात. मात्र, हजारो विद्यार्थ्यांतून काही मोजकेच विद्यार्थी यशाची पायरी चढतात. काही वर्षांपासून कोचिंगचे फॅड सर्वत्र पसरलेले दिसत आहे. शाळेच्या शिक्षणापेक्षा ही कोचिंग क्लासेसच्या शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात असल्याचे सध्या दिसत आहे.

## शिष्यवृत्ती अर्जासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**गोंदिया :** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये शिक्षणासाठी शिष्यवृत्ती अर्ज करताना काही विद्यार्थ्यांनी चुकून अथवा अनावधानाने 'Right To Give Up' पर्याय निवडला होता. त्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास अडचण निर्माण झाली आहे. यासाठी समाज कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना एक संधी देण्यात आली असून, त्यांनी ३० जून २०२५ पर्यंत 'Revert Right To Give Up Application' ऑनलाईन पद्धतीने सादर करून आपली शिष्यवृत्ती पूर्ववत मिळवण्याची अंतिम संधी दिली आहे.

या प्रक्रियेनंतर अर्ज सादर न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज समाज कल्याण कार्यालयाकडून विचारात घेतले जाणार नाहीत. यासाठी विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर लॉगिन करून नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

सदर तांत्रिक प्रक्रियेबाबत कोणीही शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनामार्फत ही अंतिम मुदत जाहीर करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीच्या आत अर्ज दाखल करून आपली शिष्यवृत्ती सुनिश्चित करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गोंदिया, किशोर भोयर यांनी केले आहे.

## महालगाव शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात



**अर्जुनी मोरगाव :** तालुक्यातील महालगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे प्रवेशोत्सव व नवगतांचे स्वागत उत्साहात करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरूवात सर्वप्रथम विद्यार्थ्यांची प्रभात फेरी पारंपारिक बैलबंडी वरून सजावट करून काढण्यात आली. गावातील भजनी मंडळाच्या सहकार्याने फेरी काढण्यात आली. नवागतांचे पुष्पगुच्छ देऊन लेझीमच्या पथकाद्वारे स्वागत करण्यात आले. त्यानंतर शाळेत विद्यार्थ्यांना लेखन साहित्य, पुस्तके, गणवेश, जूते मोजे व मिठाई वितरण करण्यात आले विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे माझे पहिले पाऊल अंतर्गत घेण्यात आले.

याप्रसंगी ग्राम पंचायत सदस्य ओमप्रकाश नाईक, काजल नंदागवळी, रसिकाताई मारगाये, शाळा समितीचे अध्यक्ष भाऊराव खोब्रागडे, उपाध्यक्ष लालचंद मारगाये, पोलीस पाटील नूतन गेडाम, सदस्य नामदेव नाईक, बाबुराव भोयर, युवराज चुलपार, विशाखा रामटेके , हेमलता नाईक, दुर्गाताई भोयर, गीताताई चव्हारे, रेखाताई मारगाये, सुगंधाताई नाईक, भीमराव रामटेके, यशवंत चुलपार, टीकाराम मारगाये, दिलीप रामटेके, रमेश रामटेके, पूजाताई रामटेके, प्रेमलता नाईक , कृषी सहाय्यक विजय झडपे, पुष्पाताई नाईक, कोमलताई खोब्रागडे, योगेश मारगाये, कार्तिक राने, शाळेचे मुख्याध्यापक जी.पी.रामटेके, सहाय्यक शिक्षक एल.एस. हुकरे व गावातील नागरिक पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वनखात्याकडून मारुती चितमपल्ली यांना आगळी-वेगळी श्रध्दांजली



**नवेगावबांध :** वनविभागातील आपल्या सेवाकाळात सर्वाधिक काळ वास्तव्यास असलेल्या नवेगावबांध येथे वनमहर्षी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांना वनविभागाच्या वतीने आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

चितमपल्लींच्या मृत्यूपत्रातील इच्छेनुसार त्यांच्या पावन अस्थी नवेगावबांध येथील नवेगावबांध तळयात विसर्जित करण्यात आल्या. त्यांनी मृत्यूपत्रातून जांभूळझरी येथील माधवराव पाटलांच्या समाधी शेजारी स्मारक व्हावे अशी इच्छाही प्रदर्शित केली होती.

चितमपल्ली यांचे संपूर्ण आयुष्य निसर्गाच्या सान्निध्यात, पशु-पक्षी-प्राणी यांचे जतन करण्यात गेले. पशुपक्ष्यांच्या अधिवासांचे जतन करण्याकडे त्यांचा ओढा असायचा. पशुपक्ष्यांचे आवडता आणि हक्काचा अधिवास म्हणजे वड आणि पिंपळ. कारण ह्या वृक्षांचे आयुष्य शेकडो वर्षांचे असते. हेच ध्यानात ठेवून माधवराव पाटलांच्या समाधी शेजारी वडाचे झाड लावून त्यांना वनखात्यातर्फे आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दिवंगत चितमपल्ली साहेबानांही जंगलात सिमेंट कॉंक्रिटची समाधी अपेक्षित नसणार अशी श्रध्दा ठेवून ही अनोखी श्रद्धांजली वाहण्यात आली.

सदर वृक्षारोपण वनसंरक्षक (प्रादेशिक) श्रीलक्ष्मी, क्षेत्र नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे संचालक जयरामे गौडा, उपवनसंरक्षक पवन जोंग यांच्या पुढाकाराने अतुल देवकर ( डीएफओ वन्यजीव नवेगाव-नागझिरा), अविनाश मेश्राम (सहा.वन संरक्षक), सदाशिव अवघान (वन परिक्षेत्र अधिकारी) व इतर अनेक वनकर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडले. यासाठी खास नागपूरहून चंद्रकांत रागीट, मारुती चितमपल्ली यांच्या बहुतांश पुस्तकांचे प्रकाशक मकरंद कुलकर्णी, तर वर्ध्याहून कौशल मिश्रा, एन.व्ही.हूड, ॲड.ताम्रध्वज बोरकर, बुद्धदास मिरगे, राजदीप राठोर, शाहरूख इनामदार व स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

## नेब ॲक्टीव्हीटी सेंटर द्वारे दृष्टीबाधितांना टॉक बैंकचे प्रशिक्षण



**गोंदिया :** डॉ. हेलन केलर यांच्या जयंती निमित्त नॅब ॲक्टीव्हीटी सेंटर गोंदियाच्या कार्यालयात दृष्टीबाधितांना टॉक बैंक चे प्रशिक्षण ता.२७ जून रोजी घेण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. डी. राउत यांनी डॉ. हेलन केलर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राजकुमार गौतम यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्व पटवून दिले. प्रास्ताविक भाषणात महेश बन्सोड यानी दृष्टीबधीतांकारिता एंड्रॉइड मोबाइल मधील टॉक बैंक सॉफ्टवेयरचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे औचित्य साधित उपस्थित पूर्णतः दृष्टीबाधित विद्यार्थ्यांना टॉक बैंक चे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन गजानन धावडे यानी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संदीप खोब्रागडे यांनी मांडले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रमेश मौजे, गगन डोंगरे, घनश्याम जडेजा, प्रीती चौधरी, रोशनी खोब्रागडे ,मालता मेश्राम व नंब ॲक्टीव्हीटी सेंटर च्या परिवारातील सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## अन्नप्रक्रिया उद्योग उभारा; ३५ टक्के अनुदान मिळवा

**गोंदिया :** सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा आधार घेऊन आपल्या परिसरात जिल्ह्यातील शेतमालाचे सर्वाधिक उत्पादन असेल, त्यानुसार सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घेऊन उद्योग उभारता येतो. सध्या कार्यरत असलेले व नवीन स्थापित होणारे वैयक्तिक सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग तसेच शेतकरी उत्पादक गट, संस्था, कंपनी, स्वयंसहायता गट व सहकारी उत्पादक संस्था यांची पतमर्यादा वाढविणे, हे शासनाचे धोरण आहे. उत्पादनांचे ब्रँडिंग व विपणन अधिक बळकट करून त्यांना संघटित अशा पुरवठा साखळीशी जोडणे. महाराष्ट्रातील सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांना औपचारिक रचनेत आणण्यासाठी सहाय करणे, सामाईक सेवा जसे की साठवणूक, प्रक्रिया सुविधा, पॅकिजिंग, विपणन तसेच उद्योग वाढीसाठी सर्वकष सेवांचा सूक्ष्म उद्योगांना अधिक लाभ मिळवून देणे, अन्नप्रक्रिया क्षेत्रातील संशोधन व प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण यावर भर देणे, सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांनी व्यावसायिक व तांत्रिक सहायाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, यासाठी प्रयत्न करणे.

## महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे सुयश



**गोंदिया :** यंग इंजिनियर एज्युकेशन सोसायठी व्दारे संचालित खमारी येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी औषध निर्माण शास्त्र परीक्षेत यश संपादन केले. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी रूची भट्ट हिने ७५ टक्के गुण घेवून प्रथम, उज्वल रहांगडाले ७३.४० व्दितीय तर तिलेश गौतम ७० टक्के गुण घेवून तृतीय क्रमांक पटकाविला.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण महामंडळाच्या वतीने उन्हाळी २०२५ औषध निर्माण शास्त्र परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून यामध्ये महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी भरघोष यश संपादन केले. डी फार्म व्दितीय वर्षाची विद्यार्थिनी पुजा पटले ८१.४६ टक्के गुण घेवून प्रथम, वैष्णवी गुजर ८०.४६ टक्के गुण घेवून व्दितीय, आदित्य शिंगाडे ७२.८२ तृतीय क्रमांक पटकाविला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थापक देवेंद्र पीसे, प्राचार्य डॉ.संदिप कुमार अग्रवाल, दिलीप कटरे, तसेच सर्व शिक्षक वृंद रूचित टेंभरे, सुचिता पांडे, मंगेश लिल्हारे, सिंधू वैरागडे, जागृती शिवणकर, मेघा चुटे, प्राची भगत, शुभम परिहार, अनिकेत साखरे, अमित तिवारी, मीना मेश्राम, दिलीप बनकर, विद्या रहिले आदिंना दिले आहे.

## वनरक्षक राजेश्वर उईके यांचा सत्कार

**सडक अर्जुनी :** वनपरिक्षेत्र कार्यालय सडक अर्जुनी येथील वनरक्षक राजेश्वर उईके यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. वनपरिक्षेत्र कार्यालय कोहमारा येथे २४ जून रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन ठाकरे होते. याप्रसंगी अतिथी म्हणून वनक्षेत्र अधिकारी उमेश गोटेफोडे, वरिष्ठ लिपिक रणधीर खोटेले, विपुल शहारे, किशोर बडवाईक, सुरेश कोरे, डिके खोटेले आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी वनरक्षक उईके यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेवून विभागाच्या वतीने वनपरिक्षेत्र अधिकारी ठाकरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट

**सडक अर्जुनी :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून सौंदड निवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा सामाजिक कार्यकर्ते अनिल मेश्राम यांनी जी प प्राथमिक शाळा नागरी सौंदड क्र एक येथे जाऊन इयत्ता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट दिले.तसेच एकल पालकांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य रजीस्टर, पेन, कंपास बॉक्स इत्यादी आवश्यक साहित्य भेट दिले. यात तनवीर चोपकर ५ वी , अजित मांडारकर ५ वी,रिया ओमकार कोचे ५ वी, तन्वी रहेले ५ वी यशस्वी रहेले ३ री भार्गव सुर्यवंशी इयत्ता २ री यांचा समावेश आहे सर्व प्रथम राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी मुख्याध्यापक सौ मालता एच कऱ्हाडे, शिक्षक देवेंद्र बनकर, महेश हत्तीमारे,कु कल्पना राऊत,सेवक वासनिक तसेच मोहिनी ईरले उपस्थित होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच सामाजिक न्याय दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले.अनिल मेश्राम यांनी या प्रसंगी शाळेसाठी भारताचे संविधान मुख्याध्यापक यांना भेट दिले.संचालन महेश हत्तीमारे यांनी केले तर आभार कु कल्पना राऊत यांनी मानले.

## प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडा येथे योग दिन साजरा



**सडक अर्जुनी :** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडा येथे कार्यरत अधिकारी, कर्मचारी व आशा सेविका यांनी सामुहीक योग करुन जनजागृती केली. यावेळी विविध योगाचे प्रकाराचे आसन प्रात्यक्षिक व माहीती वैद्यकीय अधिकारी यांनी समजवुन सांगितले.आशा सेविका मिरा कोरे,रंजिता टेकाम,वर्षा तागडे,आशा नेवारे,मिना मेश्राम, प्रतिभा खोटेले यांनी सादर केलेले योगकमळ विशेष आकर्षण ठरले.

दरवर्षी २१ जून हा दिवस एका थीमसह साजरा केला जातो.या वर्षीची थीम 'एक पृथ्वी, एक आरोग्य' आहे. या थीमच्या माध्यमातून निसर्गाचा आदर करावा. कारण आपले आरोग्य हे पृथ्वी ग्रहाच्या आरोग्याशी जोडलेले आहे. त्यामुळे जर आपण आपल्या ग्रहाचे रक्षण केले नाही तर आपण निरोगी राहू शकत नाही. कारण पृथ्वी वर असलेली हवा, पाणी तसेच आपण खातो ते अन्न या सर्व गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत.त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्याची आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढविण्यात योगाची महत्त्वाची भुमिका असल्याची माहीती यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.जगन्नाथ चाटे यांनी दिली आहे. निरोगी शरीरासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी योगा खूप महत्त्वाचा असतो.कर्करोग, मधुमेह आणि दम्यासारख्या गंभीर आजारांपासून आराम मिळण्यासाठी उपचारांसोबत दररोज योग अवश्य करावा.यामुळे शरीर तंदुरुस्त राहण्यासोबतच हाडे मजबूत होण्यास मदत होत असल्याची माहीती यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.सुशांत ठाकरे यांनी उपस्थितांना दिली. सदर योग शिबीर वैद्यकीय अधिकारी डॉ.जगन्नाथ चाटे, डॉ. अमिता नरडेले,डॉ.सुशांत ठाकरे, आरोग्य सहाय्यक ईष्टामे यांचे सह आशा सेविका,आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका उपस्थित होते.

# पावसाच्या सरी कोसळल्या; पेरणीची लगबग सुरू !

**गोंदिया :** जिल्ह्यातील शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत होता. पावसाअभावी शेतीकामे रखडून पडली होती. पेरणीसाठी समाधानकारक पावसाची अपेक्षा असताना पाऊस येत नसल्याने चिंता वाढली होती. अशातच मागील दोन दिवसांपासून पावसाचे आगमन झाले आहे. पावसाच्या सरी आल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकायला लागला आहे. कोरडवाहू क्षेत्रात पेरणीसह अन्य शेतीकामांची लगबग सुरू झाली आहे. शेतशिवार शेतकरी व मजुरांनी फुललेले दिसत आहे.

शेतकरी वरुणराजाच्या आगमनाने सुखावला असून, पुन्हा नव्या उमेदीने खरीप पेरणीसाठी सज्ज झाला आहे. पावसाच्या प्रारंभामुळे शेतकऱ्यांची बियाणे खरेदीसाठी कृषी केंद्रांत वर्दळ वाढली आहे. शेतकरी कामाला लागला असतानाच त्यांच्या सोयीसाठी कृषी विभागही कामाला लागला आहे. खरीप पेरणीपूर्व मशागत करून शेतकरी पावसाची वाट पाहत होते. दोन दिवसांपासून झालेल्या पावसाने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी मृग नक्षत्रातच पेरणी केली असून, त्यांना मोठी चिंता लागली होती. आता वातावरणात बदल झाला असून, पावसाची शक्यता वाढली आहे.

### शेती कामांना वेग : शेतकरी व मजुरांनी शिवार फुलले



### अंकुरलेल्या पिकांना संजीवनी

जून महिन्याच्या प्रारंभापासून दडी मारून बसलेल्या पावसाने अखेर हजेरी लावली असून, तुरळक पावसाला सुरुवात झाली आहे. जून महिना शेवटच्या टप्प्यात आल्यानंतर आता कुठे पाऊस बरसत असून, पावसाळा सुरू झाल्याचा अनुभव करून देत आहे. या पावसामुळे कोरडवाहू क्षेत्रातील अंकुरलेल्या बियाण्यांना संजीवनी मिळाली आहे, तर सिंचित क्षेत्रातील शेतकरी पुढचा हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन धान रोवणीकरिता नियोजित वेळापत्रक आखत आहे.

### आता आर्द्रावर शेतकऱ्यांची नजर

मृग नक्षत्र संपेपर्यंत एकदाही दमदार पाऊस झाला नाही. मृग नक्षत्राने शेतकऱ्यांच्या हातावर तुरी दिल्या. मृगाच्या कोल्ह्याने धावती भेटसुद्धा दिली नाही. संपूर्ण नक्षत्र कोरडेच गेले, असे म्हटले तरी ते अतिशयोक्ती ठरणार नाही. २२ जून रोजी आर्द्रा नक्षत्राला सुरुवात झाली आहे. आता शेतकऱ्यांची दारोमदार आर्द्राच्या उंदरावर अवलंबून आहे. उंदराने टणाटणा उड्या मारत नियमितपणे आनंदसरी बरसवाव्यात व शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील हास्य फुलवावे, अशी अपेक्षा आहे.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक : No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

